रविवार, दि. ८ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३०३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## ‘हद कर दी आपने’

### महावितरणच्या कारभारावर माळीपुरा भागातील नागरिकांच्या संतप्त प्रतिक्रिया

**जालना । प्रतिनिधी -** महावितरण पावसाळ्यापुर्वी करण्यात येणाऱ्या कामामध्ये यंदा हलगर्जीपणा झाल्याचे दिसून येत आहे. थोड्याशा वारा-वादळ, पावसामुळे दोन-दोन, चार-चार तास वीजचे पुरवठा खंडीत होतो आहे. गेल्या महिनाभरापासून तर जालना शहरातील प्रत्येक भागातील नागरिक महावितरणच्या कारभारामुळे त्रस्त आहे. त्यातच माळीपुरा भागात तर वीजेच्या तारा जीर्ण झाल्यामुळे वारंवार तुटून पडत आहेत. ज्यामुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकाराकडेही महावितरणचे अधिकारी लक्ष देत नाही. परिणामी माळीपुरा भागातील नागरिकांच्या संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. राजकीय पुढाऱ्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरावे अशी मागणी या भागातील नागरिक करत आहेत. तर दुसरीकडे महावितरण्याच्या अधिकाऱ्यांबद्दल आता ‘हद करदी आपणे’ म्हणण्याची वेळ आली असल्याचे दिसून येत आहे.

जालना शहरातील महवितरणच्या कारभाराबाबत काय बोलावं, किती बोलावं, कुणाला बोलावं असा मोठा प्रश्न शहरवासियांना पडला आहे. महावितरणच्या निगरगट्ट अधिकाऱ्यांबाबत पालकमंत्र्यांसह, खासदार, आमदारांना जाब विचारणार असल्याचे माळीपुरा भागातील रहिवासी सांगत आहे. मुस्लीम बांधवांचा बकरी ईद सण असतांना देखील शनिवार (दि ७) रोजी सकाळपासूनच माळीपुरा भागातील विद्युत पुरवठा बंद होता. या भागातील नागरिकांकडून महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र, अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली नाही. या भागातील विद्युत पुरवठा करणारी रोहित्र अत्यंत खराब अवस्थेत आहे. विद्युत तारा जीर्ण झालेल्या आहेत. या तारा वारंवार तुटून पडत आहेत. मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे. याबाबत तक्रारी महावितरणकडे करण्यात आलेल्या आहेत. परंतू कोणीही अधिकारी नागरीकांच्या समस्या जाणून घेण्यास तयार नाही. माळीपुरा भागामध्ये विद्युत पुरवठा खंडित असल्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

जालना शहरातील अनेक संघटना, अनेक संस्था, राजकीय पक्ष यांच्या वतीने महावितरणला लेखी निवेदने, तक्रारी, सूचना देण्यात आल्या आहेत. याची कोणतीही तमा हे अधिकारी बाळगत नसल्याचे आता स्पष्ट होत आहे. महावितरणच्या अशा भोंगळ कारभारामुहे शहरवासियांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्यामुळे नागरिकांमधून रोष व्यक्त होत आहे.



## घरकुलासाठी मोफत वाळू; सरकारच्या धोरणाने गरिबांना दिलासा - आमदार बबनराव लोणीकर

### आ. लोणीकर यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना मोफत वाळू पास वाटप



**परतूर । मंठा । प्रतिनिधी -** सन्मानाने जगण्याचा हक्क आणि सुरक्षित निवारा ही मूलभूत गरज आहे. याच उद्दिष्टाने केंद्र आणि महाराष्ट्र सरकारने अनेक योजनांच्या माध्यमातून क्रांतिकारी पावले उचलली आहेत, आणि मला अभिमान आहे की, मी आपल्या परतूर-मंठा मतदारसंघात या योजनांच्या अंमलबजावणीत सक्रिय सहभागी आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याची माजी मंत्री परतुर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. परतूर आणि मंठा तालुक्यातील विविध घरकुल योजनांअंतर्गत (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, रमाई आवास योजना, पंतप्रधान आवास योजना, शबरी आवास योजना, यशवंतराव चव्हाण आवास योजना, पारधी आवास योजना, आणि आदिम आवास योजना) पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी महाराष्ट्र शासनाच्या मोफत वाळू धोरणानुसार प्रति घरकुल ५ ब्रास वाळू मिळण्यासाठी पास देण्याचा निर्णय परतूर आणि मंठा तहसील कार्यालयांमार्फत घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, दिनांक ७ जून २०२५ रोजी शनिवारी, परतूर विधानसभा मतदारसंघाचे माजी मंत्री आणि आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते परतूर आणि मंठा तहसील कार्यालयांमध्ये मंजूर घरकुल असलेल्या पात्र लाभार्थ्यांना हे वाळू पास वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित घरकुल मंजूर असलेल्या लाभार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की परतूर-मंठा मतदारसंघाचा आमदार म्हणून, मी प्रत्येक गावात, प्रत्येक वाडी वस्तीवर जाऊन लाभार्थ्यांशी संवाद साधला आहे. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि तहसील कार्यालयांमार्फत योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचवला. मोफत वाळू पास वाटप हा त्याचाच एक भाग आहे. माझा संकल्प आहे की, आपल्या मतदारसंघातील एकही पात्र लाभार्थी घरकुलापासून वंचित राहणार नाही. आदरणीय बंधू-भगिनींनो, केंद्र आणि राज्य सरकारच्या या योजनांमुळे लाखो गरिबांचे जीवन बदलले आहे. पक्के घर म्हणजे केवळ भिंती आणि छप्पर नाही, तर ते सन्मान, स्थैर्य आणि स्वप्नांचा पाया आहे. मी आपणा सर्वांना आवाहन करतो की, या योजनांचा लाभ घ्या, आपल्या गावातील पात्र व्यक्तींना याबाबत जागरूक करा आणि सरकारच्या या प्रयत्नांना आपले सहकार्य द्या. असे आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले. या प्रसंगी परतूर येथे भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे, रमेश भापकर संपत टकले संभाजी वारे, कृष्णा आरगडे, पद्माकर कवडे, बंडू मानवतकर, सिताराम राठोड, निर्दास राठोड, विक्रम धुमाळ,भगवान आरडे, प्रकाश दीक्षित यांच्यासह उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार प्रतिभा गोरे, गटविकास अधिकारी तांगडे यांची तर मंठा येथे नितीन राठोड, वैजनाथराव बोराडे, अजय अवचार, अमोल मोरे, आनंद जाधव, विक्रम उफाड, विलास घोडके, दीपक बोराडे, मनोज बापू देशमुख, कल्याण बापू, उपविभागीय अधिकारी जालना, उपविभागीय अधिकारी गायकवाड परतुर विभाग, तहसीलदार मंठा गटविकास अधिकारी गगनबोने मंठा यांची उपस्थिती होती.

युवा आदर्श

### अधिकार ...

अधिकाऱ्यांची खुर्ची
चोहो बाजूनि दबाव
दृश्यअदृश्य कित्येक
टाकत राहती प्रभाव
ऐकता सारे वरिष्ठांचे
पदोन्नती मिळे वाव
लंगडणारा घोडाही
धावू लागतो भरधाव
अवैध कामाचा सहज
हळू हळू होई सराव
पापकर्मे घालू लागे
दाही दिशांनी घेराव
सत्तेची नशा निराळी
वेळी अवेळी ती हाव
बदनामी करे पुरेपूर
चारित्र्यां वर्मी घाव
लफडे पडता उघडे
याचे एकट्याचे नाव
जबाबदारी मज नको
तुझे तूचं सावर राव
अस्मिता पडे एकाकी
काळजाचा घेते ठाव
लढणारा पडे एकटा
ओसाड अख्खा गाव

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

## नाथ महाराजांचा पालखी रथ सजावटीसाठी जालनेकरांचा ११ किलो चांदी देण्याचा संकल्प

**जालना । प्रतिनिधी -** शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज यांच्या १४२ वर्षांच्या परंपरेने सजलेल्या आषाढी वारी पालखी सोहळ्यातील रथाला पुणे येथे चांदीची सजावट करण्यात येत असून, काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. १५ जूनपर्यंत हे काम पूर्णत्वाकडे न्यावयाचे असून, एकूण १२० किलो चांदीची आवश्यकता आहे. जालना शहरातूनही ११ किलो चांदीचे योगदान देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. आतापर्यंत ८० किलो चांदी जमा झाली असून, आणखी ४० किलो चांदीची आवश्यकता असल्याने, इच्छुकांनी आपापल्यापरीने योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात

पान २ वर



## प्रशासनाला वठणीवर आणण्यासाठी अरविंद देशमुख यांनी शेतकरी आंदोलकांना दिले आसुड

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याच्या देवमूर्ती येथे शेतकऱ्यांच्या वतीने शेतकरी योद्धा दिलीप राठी यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या धरणे आंदोलनाला मराठा महासंघाने पाठिंबा दिला आहे. जालन्यात प्रशासनाला वटणीवर आणण्यासाठी शेतकऱ्यांच्या आंदोलकाना मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी आसूड दिले आहे जालना - नांदेड समृद्धी महामार्गात गेलेल्या जमिनीला योग्य मावेजा द्या या मागणीसाठी जालना - नांदेड समृद्धी महामार्ग बाधित शेतकरी देवमूर्ती येथे धरणे आंदोलनाला बसले आहेत. देवमुर्ती येथील या धरणे आंदोलनाचा आजचा ३७ वा दिवस आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या या आंदोलनाची अद्याप शासनाकडून दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यामुळे मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी आसुड दिले आहे. जालना - नांदेड समृद्धी महामार्ग बाधित शेतकरी आक्रमक झाले आहेत. दरम्यान, आज मराठा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी या आंदोलनाला भेट देऊन आंदोलनाला

पान २ वर



## दिक्षा वानखडे-शेगोकार यांना वाणिज्य विषयात पीएच.डी पदवी प्रदान

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विषयात दिक्षा वानखडे-शेगोकार यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली,दिक्षा वानखडे -शेगोकार यांनी महिला उद्योजकता आणि सक्षमीकरणाच्या विकासात जिल्हा औद्योगिक केंद्राचा अभ्यास:विशेष संदर्भ मराठवाडा आणि विदर्भ या विषयावर डॉ. सतीश ढोके यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोधप्रबंध सादर केला, दिक्षा वानखडे यांना पीएच.डी पदवी प्रदान झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे,याप्रसंगी दिक्षा वानखडे यांना प्राचार्य राजेश शेगोकार, डॉ. मिलिंद आठवले,ॲड. नोवेलकुमार हेलोडे,प्रा. शिलवंत गोपनारायण, डॉ.विनोद अंभोरे, डॉ. राहुल तायडे, विवेक वानखडे, प्राजक्ता आठवले, दिव्या हेलोडे, संजय गाडेकर व डॉ.अंकुश गवई यांनी शुभेच्छा दिल्या.



### धारकल्याण येथे आ. खोतकर यांच्या हस्ते विविध विकास कामांचे भुमिपुजन

## घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळूचे ई-पास वाटप

**जालना । प्रतिनिधी -** सदानंद महाराज मठ धारकल्याण येथे तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत भक्त निवास भोजन कक्ष व विश्रांती मठ या कामासाठी विशेष प्रयत्न करून आ. अर्जुनराव खोतकर यांनी मंजुरी घेतली या विकास कामांचे भुमिपुजन आ. खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्याच बरोबर घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत वाळुचे ई-पासचे वाटप करण्यात आले. गावातील नागरिकांना जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जीवंत ७/१२ उतारे, अशा आवश्यक कागदपत्रांचेही यावेळी वाटप करण्यात आले.

प्रसंगी एका व्यक्तीकडून एक झाड हे सूत्र स्विकारून वृक्ष लागवडीसाठी विशेष उपक्रमाची सुरूवात करण्यात आली.



नागरिकांना वेळेत व पारदर्शक सेवा देणे, सातबारा, उत्पन्न, जातीचे प्रमाणपत्रे वेळेवर उपलब्ध करून देणे, घरकुल, पाणी योजना, शौचालय, वृक्ष लागवड योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करा, कोणताही लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये, शासन निर्णय हे फाईलीपुरते न राहता जमिनीवर उतरले पाहिजे यासाठी प्रयत्नशील राहण्याच्या सुचना यावेळी आ. खोतकर यांनी महसुल विभागातील मंडळ अधिकारी, तलाठी, पंचायत समितीचे अधिकाऱ्यांना दिल्या आहे. प्रत्येक घरापर्यंत योजनांची माहिती पोहचवावी असा सल्ला वजा आदेश आ. खोतकरांनी यावेळी ग्रामसेवकांना दिले.

या कार्यक्रमाला गावातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद होता. गावातील विकासाचे नवीन पर्व सुरू झाल्याची

पान २ वर

# संपादकीय

## जल्लोषाचे रूपांतर शोकसागरात!

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर देशभर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला अर्थात आपला संघ विजेता ठरल्यानंतर अशा प्रकारचा स्वागत समारंभ आयोजित करण्याची ही पहिली वेळ नाही याआधीही असे अनेक स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले होते मात्र या स्वागत समारंभादरम्यान जी चेंगराचेंगरी होऊन दुर्घटना घडली तशी दुर्घटना याआधी कधीही घडली नाही. या दुर्घटनेत ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३० हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. मंगळवारी मध्यरात्री आयपीएलचा अंतिम सामना पार पडल्यानंतर २४ तासाच्या आत असा समारंभ घेण्याची गरज होती का ? हा समारंभ आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का ? अवघ्या २४ तासाच्या आत इतक्या मोठ्या समारंभ आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाही पोलिसांशी चर्चा केली होती का ? हा समारंभ चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित करण्यात आला या स्टेडियमची क्षमता ३५ ते ४० हजार इतकी आहे प्रत्यक्षात या समारंभासाठी त्याच्या दहा पट म्हणजे अडीच ते तीन लाख क्रिकेट चाहते जमा झाले. या समारंभाला अपेक्षेपेक्षा अधिक चाहते जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का ? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेसे पोलिस बळ होते का ? हा समारंभ म्हणजे केवळ इव्हेंट होता का ? या समारंभाच्या आडून राजकीय स्वार्थ साधला जाणार होता का ? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ११ क्रिकेट चाहत्यांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण ? आयोजक, कर्नाटक सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही क्रिकेट चाहते? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सव प्रिय आहेत. विशेषतः तरुणांना उत्सवात सहभागी होण्याची फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ११ क्रिकेट चाहत्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# पाकिस्तानला प्रथम वर्ल्ड बँकेचे कर्ज; आता आशियाई बँकेचे कर्ज कुठे गेले आतंकवाद विरोधी देश?

पहलगाम हल्ल्यानंतर जगातील अनेक देशांनी आतंकवादी हल्ल्याची निंदा केली होती.सोबतच यात पाकिस्ताचा हात असल्याचे जगजाहीर असल्याने अनेक देशांनी पाकिस्तानची सुध्दा निंदा केली.फक्त चीन,बांगलादेश आणि तुर्की यांनी पाकिस्तानला खुले समर्थ केले होते आणि पाकिस्तानच्या घृणास्पद कारवाईच्या विरोधात संपूर्ण देश भारताच्या समर्थनार्थ उभे असल्याचे सांगण्यात आले होते आणि तसे दिसत सुध्दा होते.परंतु ऑपरेशन सिन्दुरच्या कारवाईमध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले.यात आतंकवाद्याचे अड्डे व पाकिस्तानचे एअर बेस उध्वस्त करण्यात आले.यात पाकिस्तानला अरबो रूपयांचे नुकसान सहन करावे लागले. पाकिस्तान आतंकवाद्यांचे माहेरघर आहे ही बाब अमेरिकेसह जगाला माहीत असतांना सुध्दा अमेरिकेने पाकिस्तानला वर्ल्ड बँकेकडुन कर्ज मिळावे यासाठी पुढाकार घेतला व पाकिस्तानला ताबडतोब आय.एम.एफ. या वर्ल्ड बँकेने १ अरब अमेरिकन डॉलरचे कर्ज दिले आणि हे कर्ज मंजूर करण्यात अमेरिकेसह जगातील अनेक देशांचा हात असल्याचे स्पष्ट दिसून आले.म्हणजे अमेरिका भारतासह जगाला सांगतो की आम्ही आतंकवाद्यांच्या विरोधात खंबीरपणे उभे आहोत. परंतु अमेरिका पाकिस्तानला मदत करून भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम करतो त्यामुळे आज अमेरिका विश्वासपात्र देश रहाला नाही. आतंकवाद्यांची फॅक्टरी समजल्या जाणाऱ्या पाकिस्तानला अमेरिका नेहमीच खतपाणी घालून खुला सपोर्ट करतो व सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन सुध्दा देत असतो ही जगाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.अमेरिका नेहमी प्रमाणे आताही दोगली नितीचा वापर करीत आहे.भारत-पाक संघर्ष सुरू असतांनाच आय.एम. एफ.ने पाकिस्तानला ताबडतोब १ अरब अमेरिकन डॉलरची मदत केली आणि हे कर्ज देण्याचे काम अमेरिकेच्याच मदतीने झाले आहे.आय.एम.एफ.चे पुर्वीचे कर्ज अजुनपर्यंत पाकिस्तानने चुकविलेले नाही तरीही त्याला कर्ज देण्यात आले यावर भारत सरकारने नाराजी सुध्दा व्यक्त केली आहे ही बाब जगाला का दिसत नाही!आयएमएफ या वर्ल्ड बँकेने १ अरब अमेरिकन डॉलरचे कर्ज देऊन एक महिना सुध्दा व्हायचा आहे;तर आशियाई विकास बँक (एडीबी) ने पाकिस्तानला ८० कोटी डॉलरचे कर्ज ४ जून २०२५ ला मंजूर केले ही अत्यंत दुर्भाग्यपुर्ण बाब आहे. पाकिस्तानकडुन आर्थिक मदतीचा दुरूपयोग होण्याची शक्यता भारताने व्यक्त केलेली चिंता नजरे आड करून आशियाई विकास बँकेने (एडीबी) पाकिस्तानला तब्बल ८० कोटी डॉलरचे कर्ज मंजूर केले ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.हेही तीतकेच सत्य आहे की पाकिस्तानला आतापर्यंत मिळालेल्या कर्जाची ९० टक्के रक्कम ही आतंकवाद्यांसाठी खर्च होणार आहे आणि १० टक्के रक्कम पाकिस्तानी जनतेसाठी.एडीबीचे अध्यक्ष मसाटो कांडा यांनी १ जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली होती आणि ४ जूनला एडीबी ने कर्ज मंजूर केले यावरून स्पष्ट होते की जगातील देशांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहे हे स्पष्ट दिसुन आले.पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जगातील अनेक देशांना भेटी दिल्या आणि जागतिक पातळीवर आपली बाजू मजबूत करण्याचा प्रयत्न सुध्दा केला.परंतु जेव्हा पाकिस्तानला अलगथलग पाडण्याची वेळ आली तेव्हा जगातील अनेक देश प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रित्या पाकिस्तानच्या बाजूने उभे आहे ही बाब आयएमएफ व एडीबी बँकेने मंजूर केलेल्या कर्जावरून स्पष्ट लक्षात येते. कारण जगातील अनेक देश या बँकांचे सदस्य आहेत परंतु पाकिस्तानला कर्ज देण्याचा विरोधी कोणीच का केला नाही? असे अनेक प्रश्न स्वतःला आतंकवाद विरोधी म्हणणाऱ्या देशासमोर उपस्थित होतात.यावरून स्पष्ट होते की भारताचे शत्रू पाकिस्तान,चीन, बांगलादेश, तुर्की हेच एकटे नसुन अनेक शत्रू आहेत ही बाब पाकिस्तानला दिलेल्या कर्जावरून स्पष्ट होते.महत्वाचे म्हणजे पाकिस्तानने आतापर्यंत घेतलेल्या कोणत्याही बँकेचे कर्ज अजूनपर्यंत परत केलेले नाही तरीही त्याला जगातील अनेक देश कर्ज मिळवून देण्यासाठी सहकार्य करतात ही बाब जागतिक बँकेने दिलेल्या कर्जावरून स्पष्ट होते.यावरून स्पष्ट होते की जगातील अनेक देश दिखावा म्हणून भारतासोबत असल्याचे दिसून येते.कारण पाकिस्तानला दिल्या जाणाऱ्या कर्जाचा विरोध फक्त एकट्या भारतानेच केला व बाकीच्यांनी फक्त बघ्याची भूमिका घेतली. माझ्या माहितीनुसार भारताचा होत असलेला विकास इतर देशांना पहावल्या जात नाही.त्यामुळे कर्जाच्या माध्यमातून जगातील भारत विरोधी देश अप्रत्यक्षरीत्या कर्जाच्या माध्यमातून पाकिस्तानला मदत करीत असावेत.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

### राष्ट्रद्रोही व हिंदुद्वेषी एम.एफ. हुसेन यांच्या मुंबईतील चित्रांच्या लिलावावर बंदी घाला; अन्यथा तीव्र आंदोलन करू - हिंदु जनजागृती समिती

# भारतमातेचा घोर अपमान करणाऱ्या हुसेन यांचे उदात्तीकरण रोखण्याची मागणी

**मुंबई -** १४० कोटी भारतियांचे श्रद्धास्थान असणाऱ्या भारतमातेचे 'रेप ऑफ इंडिया' नावाने अत्यंत विकृत, बिभत्स, नग्न व अश्लील चित्र रेखाटणारे वादग्रस्त चित्रकार एम.एफ. हुसेन यांच्या अन्य २५ चित्रांचा लिलाव १२ जून २०२५ रोजी मुंबईतील हॅमिल्टन हाऊस येथील 'पांडोल आर्ट गॅलरी'द्वारे होणार आहे. या पार्श्वभूमीवर हिंदु जनजागृती समितीने आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री, मुंबईचे पोलीस आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन या लिलावावर तात्काळ बंदी घालावी व हुसेन यांच्या गुन्हेगारी कृत्याचे उदात्तीकरण बंद करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा समितीने दिला आहे.



या निवेदनात हिंदु जनजागृती समितीने म्हटले आहे की, एम.एफ. हुसेन यांनी २६/११ च्या वेळी 'रेप ऑफ इंडिया' नावाच्या चित्रात भारतमातेचा नग्न व अपमानास्पद चित्र साकारून त्यांनी देशद्रोहाची परिसीमा गाठली आहे. तर दुसऱ्या एका चित्रात भारतमातचे नग्न चित्रण काढून त्यावर विविध शहरांची नाव लिहिलेली दाखवली आहेत. अन्य चित्रांमध्ये नग्न हनुमंताच्या शेपटीवर बसलेली नग्न सीता; एका चित्रात नग्न हनुमान, नग्न राम व नग्न सीता यांना एकत्र दाखवले आहेत; श्री गणेशांना एका नग्न स्त्रीच्या मांडीवर बसवलेले; तर एका चित्रात भगवान हनुमानांना एका नग्न स्त्रीला हातात घेऊन उडताना दाखवलेले आहे. अशा प्रकारे माता सरस्वती, माता पार्वती, माता गंगा, माता यमुना आदी देवीदेवतांचे जाणीवपूर्वक विकृत, नग्न व अश्लील चित्रण करून कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा घोर अपमान केला आहे.
या अपमानास्पद चित्रांच्या विरोधात हुसेनवर देशभरात १२५० हून अधिक पोलीस तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यामुळेच देशभरात त्यांच्या प्रदर्शनांना विरोध झाला आणि अखेर हुसेन यांनी भारतातून पलायन करून कतारचे नागरिकत्व स्वीकारले होते.
समितीने पुढे म्हटले आहे की, २५ चित्रांचा लिलाव म्हणजे त्यांच्या आधीच्या राष्ट्रविरोधी व समाजविघातक कृत्यांना अप्रत्यक्षपणे समर्थन देणे होय. 'कलात्मक स्वातंत्र्य' या नावाखाली धार्मिक भावना दुखावणाऱ्या आणि देशविघातक व्यक्तींचे गौरव करणे हे कोणत्याही प्रकारे समर्थनीय नाही.
नुकतेच दिल्लीतील पटीयाला हाऊस न्यायालयाने हुसेन यांच्या प्रदर्शनातील चित्रे जप्त करण्याचे आदेश दिले असून त्याची चौकशी चालू आहे.
यापूर्वी देशभरात हुसेन यांच्या अनेक चित्रप्रदर्शनांना विरोध झालेला आहे. ती प्रदर्शने रद्द झालेली आहे. हुसेनच्या नावाने दिले जाणारे पुरस्कारही रद्द करण्यात आले आहेत.
हिंदु जनजागृती समितीने म्हटले आहे की, एम.एफ. हुसेन यांच्या चित्रांचा प्रस्तावित लिलाव व विक्री त्वरित थांबवावी व त्यावर कायदेशीर बंदी घालावी. या चित्रांचे प्रदर्शन किंवा विक्री करणाऱ्या व्यक्ती, संस्था अथवा कला गॅलरींवर कायद्यानुसार कारवाई करावी. राष्ट्रीय व धार्मिक भावना दुखावणाऱ्या चित्रकृतींच्या प्रसारावर बंदी आणावी, तसेच हुसेन यांच्या भारतमातेच्या चित्राला देशविरोधी घोषीत करावे, अशी मागणी समितीने केली आहे.
सत्यनारायण चौधरी, सहआयुक्त, कायदा आणि सुव्यवस्था (मुंबई) यांनी निवेदन स्वीकारल्यावर म्हटले की, आम्ही आमच्यापरीन कार्यवाही करु; सांस्कृतिक मंत्रालय यावर परिणामकारक कार्यवाही करु शकेल. असा आशावाद हिंदू जनजागृती समितीकडून व्यक्त करण्यात आला आहे.

## खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

**जालना । प्रतिनिधी** - राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर योजने अंतर्गत ऑगस्ट २०२५ सत्रातील प्रवेश हे केंद्रिय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियाद्वारे करण्यात येत आहे.

येथील हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सर्व व्यवसाय मिळून ४१२ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. प्रवेशासाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख २६ जून २०२५ असून प्रवेश अर्ज निश्चित करणे व संस्थानिहाय व्यवसायाचे विकल्प व प्राधान्य क्रम भरण्याची शेवटची तारीख २७ जून २०२५ आहे.

उमेदवारांनी प्रवेश अर्ज ऑनलाईन भरणे गरजेचे आहे. अर्ज भरण्यासाठी उमेदवारांनी ITI Admission Portal:https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

आय.टी.आय. प्रवेशासाठी या संस्थेत, फॅशन टेक्नॉलॉजी, सुईग टेक्नॉलॉजी, कोपा, डीझेल, संधाता, पत्रेकारागीर, यंत्रकारागीर, कातारी, जोडारी, यांत्रीक विजक, प्रशितन व वातानुकूलित टेक्नीशियन, आरेखक स्थापत्य, यांत्रीक मोटार गाडी, विजतंत्री, तारतंत्री असे एकुण १५ व्यवसाय उपलब्ध आहेत. महिलासाठी प्रत्येक व्यवसायात ३० टक्के जागा राखीव आहेत व अधिक माहितीसाठी वरील संकेतस्थळावर भेट द्यावी व जास्तीत जास्त उमेदवारांनी प्रवेश अर्ज भरावेत विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरतांना काही अडचण आल्यास संस्थेतील प्रवेश विभागास संपर्क साधावा, असे आवाहन रजनी शेळके प्राचार्य यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## आयटीआयमध्ये इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या पुढाकारातून, मराठवाडा ॲक्सेलरेटर फॉर ग्रोथ अँड इन्क्युबेशन कौन्सिल (MGIC) च्या सहकार्याने, जालना येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) येथे देशातील पहिले -कॅम्पस आधारित इन्क्युबेशन सेंटर स्थापन करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत १० हजार चौ. फुट क्षेत्रफळ असलेली जागा मॅजिक संस्थेस उपलब्ध करून देण्यात आली असून, संस्थेच्या माध्यमातून 'मॅजिक-जालना आयटीआय इनोव्हेशन टेक्निकल चॅलेंज २०२५' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते करण्यात आले असून, जिल्हाधिकारी यांनी याप्रसंगी संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबद्दल शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बदनापूरचे आमदार नारायण कुचे, मॅजिकचे संचालक रितेश मिश्रा, उद्योजक नितीन काबरा, अनुज बन्सल, आयटीआय जालना येथील प्राचार्या सौ. रजनी शेलके आणि मॅजिकचे इन्क्युबेशन मॅनेजर शशिकांत तिवारी उपस्थित होते.

या स्पर्धेच्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील शासकीय आयटीआय संस्थांमधील विद्यार्थ्यांकडून नाविन्यपूर्ण, तांत्रिक कल्पना मागवण्यात येणार आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, प्रमाणपत्रे व स्टार्टअप किट देण्यात येणार असून, टॉप सहा टीम्सना थेट मॅजिक आयटीआय इन्क्युबेशन सेंटरमध्ये मार्गदर्शन व सहाय्य मिळणार आहे.

या इन्क्युबेशन सेंटरची संकल्पना महाराष्ट्र स्टार्टअप धोरण २०१८ अंतर्गत मांडण्यात आली होती. या धोरणाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय आयटीआय कॅम्पसमधून स्थानिक समस्यांवर आधारित नाविन्यपूर्ण उपाययोजना शोधणे व ग्रामीण भागातील स्टार्टअप्ससाठी सक्षम पारिस्थितिकी तंत्र निर्माण करणे हा आहे. मॅजिकमार्फत उभारले जाणारे हे केंद्र ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संशोधन, प्रोटोटायपिंग, मॉडेलिंग व टेस्टिंग लॅब्ससारख्या अत्याधुनिक सुविधा प्रदान करण्यास सज्ज होत आहे.

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (झझझ) या मॉडेलवर आधारित असलेले हे केंद्र ग्रामीण भागातील जिल्हास्तरावर उभारले जाणारे देशातील पहिले आयटीआय आधारित इन्क्युबेशन सेंटर ठरले आहे. याचा लाभ जालना जिल्ह्यातील आठ शासकीय व चार खासगी आयटीआयमधील विद्यार्थी, शिक्षकवर्ग, नवउद्योजक व स्थानिक उद्योगा मिळणार आहे. या उपक्रमामुळे जालना जिल्ह्यात तंत्रज्ञानावर आधारित नाविन्यपूर्ण उद्योजकतेचा नवा अध्याय सुरू झाला असून, मराठवाड्यातील टियर-२ व टियर-३ शहरांतील युवकांसाठी हे एक प्रेरणादायी पाऊल ठरणार आहे.

पान १ वरुन

### नाथ महाराजांचा ...

आले आहे. शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराज प्रतिवर्षी आषाढी वारीला त्यांच्या वैभवाप्रमाणे चांदीच्या रथातून पंढरीला जावेत ही सकल वारकऱ्यांची भावना लक्षात घेऊन नाथ महाराजांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याकरीता सागवानाचा नवीन रथ आणि त्याला १२० किलो चांदीचा साज चढविण्याचा संकल्प करण्यात आला असून, या रथाचे काम प्रगतीपथावर आहे. येत्या आषाढी वारी पालखी सोहळ्यापर्यंत रथाचे कार्य पूर्ण करण्याचा संकल्प आहे. या कार्याचा अपेक्षित खर्च १ कोटी ५० लक्ष रुपये एवढा आहे. चांदीमध्ये रथाच्या सजावट कार्यासाठी लोकवर्गणीद्वारे निधी संकलन सुरू असून, आणखी ४० किलो चांदीची आवश्यकता आहे. रथाला करण्यात येत असलेल्या चांदीच्या सजावटीसाठी २१ लाख रुपये मजुरी निश्चित करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातून ह. भ. प. भगवान महाराज आनंदगडकर, मनोज महाराज गौड, किशोर महाराज तिवारी, उद्योजक घनश्यामदास गोयल, रमेशभाई पटेल,पंडितराव हर्षे, विनीत साहनी, कल्याणराव देशपांडे, रामनिवास गौड, पवन जोशी, जयप्रकाश श्रीमाली, अनिल गोयल,पन्नालाल बगडिया, दिलीप व्यास, शिवरतन मुंदडा, ह. भ. प. रामदासी महाराज, जगदीश प्रिथ्यानी, संजय बुधानी, नरेश केलानी, कैलास चंदभनानी, डॉ. राजकुमार सचदेव, ड. सतीश तवरावाला, सुभाषचंद्र देविदान, संजय मुथा, मेघराज चौधरी, सुदेश सकलेचा, संजय दाड, शामसुंदर लोया, रविंद्र अबोटी, अभय कुलकर्णी, प्रसन्ना जाफराबादकर, धनंजय याडकीकर, आनंदी अय्यर, अंकुशराव राऊत, सुदेश करवा, पुरुषोत्तम मोतीवाला, दीपक अंभोरे, गणेश पडूळ, अनिल सोनी, डॉ. विठ्ठल पवार, संजय राठी, हेमंत ठक्कर, श्रीमती भारती नाईक, योगेश ठक्कर, दिलीप शहा, मनीष तवरावाला, विष्णू पाचफुले, शुभांगी देशपांडे, ड. संजय देशपांडे, अपर्णा देशपांडे, गेंदालाल झुंगे, बंकटलाल खंडेलवाल, विनीत साहनी आदींचा सहभाग आहे.
आणखी ४० किलो चांदीची आवश्यकता असल्याने या कार्याकरीता आपण रोख किंवा चांदी स्वरूपात सहकार्य करू शकता. भाविकांनी या पवित्र कार्यासाठी सढळ हाताने देणगी द्यावी, अधिक माहितीसाठी श्री रघुनाथबुवा नारायणबुवा गोसावी पालखीवाले (९२७३५१२२७९, ७९७२७०३४३४) यांच्याशी तर जालना जिल्ह्यातील भाविकांनी अभय कुलकर्णी (९८५००६५१७४) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### प्रशासनाला वठणीवर ...

आपला पाठिंबा दर्शविला आहे. यावेळी जालना - नांदेड समृद्धी महामार्गात गेलेल्या जमिनीला सरकारने योग्य मावेजा देण्याची मागणी करण्यात आली आहे. नसता रस्त्यावर उतरू असा ईशारा देण्यात आला. यावेळी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख मराठा महासंघाचे जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, शेतकरी नेते बबनराव गवारे, लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सचिन शिरसागर विशाल कोरडे पाटील, शिंदे पाटील आदींसह आंदोलक शेतकरी उपस्थित होते.

### घरकुल लाभार्थ्यांना ...

भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, ता.प्रमुख भगवानराव अंभोरे, माजी सभापती पांडुरंग डोंगरे, वसंतराजे जाधव, उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, गटविकास अधिकारी संदीप पवार, तहसीलदार छाया पवार, नायब तहसीलदार राजु निहिळ, धारकल्याणचे सरपंच किशोर देशमुख, उपतालुका प्रमुख बंडू राजे, विभाग प्रमुख गणेश भुतेकर, युवा सेना उपतालुकाप्रमुख नागेश डवले, अप्पा उगले, सुरेशराव बोरुडे, पंचायत समिती सदस्य सुनील कांबळे, सुरेश क्षीरसागर, विठ्ठल टेकाळे, रमेशराव जाधव, उद्धवराव भुतेकर, लक्ष्मण चव्हाण, सदानंद उगले, बळीराम घुले, आप्पासाहेब घोडके, गणेश राहुले, संतोषराव रासवे, विजय खरात, रामचंद्र फुलझाडे, भरत उबाळे, भागवत घुले, रामेश्वर भुतेकर गणेश मस्के, रामु दराडे आदींसह पंचक्रोशीतील शिवसैनिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ग्यानबा तुकाराम.. आश्वासनातले किती झाले काम..? असे म्हणत भास्कर आंबेकर यांचा सत्ताधाऱ्यांना प्रश्न

# भाऊ आणि दादा क्या हुआ तुम्हारा वादा... शिवसेनेच्या घोषणेने परिसर दणाणला

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील शासकीय विश्रामगृहाच्या परिसरात शिवसैनिकांनी टाळ मृदुंगाच्या तालावर ग्यानबा तुकाराम.. आश्वासनांचे किती झाले काम.? व भाऊ आणि दादा क्या हुआ तुम्हारा वादा.. असे म्हणत सत्ताधारी पक्षाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शेकडो पदाधिकारी व शिवसैनिकांनी एकत्र येऊन जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या नेतृत्वात जाब विचारला.

यावेळी उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ, बाबुराव पवार, तालुकाप्रमुख हरिहर शिंदे, शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोटीवाले, युवा सेनेचे भरत सांबरे, माजी नगरसेवक जे.के.चव्हाण, गंगुताई वानखेडे, संदीप नाईकवाडे, माजी जि.प.सदस्य बबनराव खरात, दलित आघाडीचे जिल्हासंघटक रविकांत जगधने यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे निवेदन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी आमदार खोतकर यांच्यासमोर निवडणूक काळात महायुतीच्या तिन्ही पक्षांनी दिलेली शेतकर्यांना कर्जमुक्ती देणार, सन्मान योजनेतून पंधरा हजार रुपये देणार, लाडक्या बहिणींना एकवीसशे रुपये देणार, ४४ हजार गावात पानंद रस्ते बांधणार, शेतकर्यांच्या खते बियाणे यांच्या किमतीवर नियंत्रण ठेवणार,त्यावरील एसजीएसटी अनुदान स्वरूपात वापस देणार, एक रुपयात पिक विमा देणार, वृद्धांना पेन्शन स्वरूपात २१ रुपये देणार, अन्नदात्याला ऊर्जात आता बनवून २४ तास वीज देणार,शेतमालाला हमीभाव देणार, हर घर जल हर घर छत देणार, मराठवाडा वॉटर ग्रीडला केंद्राकडून मान्यता घेणार अशा दिलेल्या विविध आश्वासनांचा पाढाच त्यांच्यासमोर वाचून 'क्या हुआ तेरा वादा..? असा सवाल केला. पुढे बोलताना भास्करराव अंबेकर म्हणाले की, मराठवाडा ही संतांची भूमी आहे संतांनी दिलेल्या वचनाप्रमाणे त्या काळातील राज्यकर्त्यांनी कारभार केला व जनतेला सुखी ठेवण्यासाठी प्रयत्न केले. परंतु आज मात्र असे होताना दिसत नाही निवडणुका आल्यानंतर येथील जनतेला शेतकर्यांना भरपूर आश्वासने देऊन त्यांची दिशाभूल करण्यात येत आहे. संतांनी सांगितल्याप्रमाने बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले, वृक्षवल्ली आम्हा सोयरे, कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी.. अशा अभंगांचे दाखले देऊन टाळ मृदुंगाच्या गजरात आणलेल्या या मोर्चाचे महत्त्व विशद करून शेतकर्यांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याची विनंती केली.

यावेळी उपस्थित पदाधिकार्यांच्या हातात शेतकर्यांच्या मागण्यांचे फलक होते. यावेळी वैद्यकीय आघाडीचे प्रमुख डॉ.राजेश राऊत, महिला आघाडीच्या प्रमुख मंगल मेटकर, मंजुषा घायाळ, तालुका संघटक बाबुराव कायंदे, शहर अल्पसंख्यांक आघाडीचे प्रमुख वसीम पठाण यांच्यासह उपतालुका प्रमुख प्रभाकर उगले, उपशहरप्रमुख किशोर नरवडे, अजय रोडिया, विभागप्रमुख प्रभाकर घडलिंग, जनार्दन गिराम, शंकर जाधव, दलित आघाडीचे बाबासाहेब पाखरे, हरिभाऊ शेळके, युवा सेना तालुकाप्रमुख संदीप मगर, युवासेना शहरप्रमुख सुदर्शन चौधरी, विष्णुपंत गिराम, परमेश्वर डोंगरे,गणेश लाहोटी, दिलीपराव डोंगरे, सखावत पठाण,



संतोष क्षत्रिय,संतोष खरात, राजू वैद्य, संतोष जमदडे, योगेश जाधव, तुकाराम भुतेकर,संजय गिराम,ऋषिकेश खिरे, स्वराज बोर्डे, प्रभाकर खरात,नंदु मतकर, जान मो.कुरेशी, गंगुताई वानखेडे, संदीप झारखंडे, निखिल घारेगावकर, किरण तुम्मा,जीवन खंडागळे, महादेव कावळे, श्याम कुलथे, रमेश तुंगेवार, शुभम गायकवाड, रामेश्वर कुरील यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जाफ्राबाद येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** जाफ्राबाद येथील कानिफनाथ महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन ऑनलाईन पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केले, तसेच अप्पर मुख्य सचिव मनीषा वर्मा यांनी देखील मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य एस.एम.के.शेख होते. प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. के.एस. पाटील, सुवर्णलंकार विविध विकास मंडळाचे अध्यक्ष गजानन उदावंत हे होते.

यावेळी प्रा. डॉ. कैलास पाटील यांनी नागरी कर्तव्य व शिष्टाचार या विषयावर मार्गदर्शन केले. भारतीय राज्यघटनेतील ४२ वी घटनादुरुस्ती मध्ये समाविष्ट दहा मूलभूत कर्तव्य व २००२ मध्ये दुरुस्तीने समाविष्ट अकरावे कर्तव्य म्हणजेच सहा ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षण देण्याची पालकाची जबाबदारी याविषयी मार्गदर्शन करताना संविधानाचा आदर आणि पालन स्वातंत्र्यसंग्रामातील आदर्शाचा सन्मान भारताची अखंडता व एकतेचे संरक्षण देशसेवा व त्यागाची तयारी सामाजिक सौहार्घ व बंधुभाव राखणे स्त्रिया व मुलींचा सन्मान सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण वैज्ञानिक दृष्टिकोन जपणे यासह अन्य विषयांवर पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी गजानन उदावंत यांनी यशस्वी आयुष्याची पहिली पायरी म्हणजे ध्येय आणि त्या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न युवकांनी व्यसनापासून दूर राहून आत्म निर्भर व्हावे, स्वयंरोजगारासाठी कौशल्य आधारित शिक्षणाचे महत्त्वही विद्यार्थ्यांनी जाणून घ्यावे असे यावेळी उदंड यांनी सांगितले. तर प्राचार्य शेख यांनी भारतातील वन पुरुष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जाधव मोलाई पाईन यांचे उदाहरण दिले १६ वर्षापासून आसाममध्ये उच्च लागवड करून ५५० हेक्टर कोरडी जमीन एक संपन्न हिरवे जंगल बनली आहे त्यांनी केलेल्या कर्तव्याबाबत पर्यावरण संरक्षण सामाजिक भान आणि वैयक्तिक जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन जे बी राठोड यांनी केले तर प्रास्ताविक जे डी चोतमल यांनी केले. आभार एस. व्हि. नायकवाडी यांनी केले. कार्यक्रमास श्रीमती शिवाय पेंढारकर, जी. एन.लांबे,आर.के. टेकाळे,बि.डी वाकेकर,श्रीमती सि.टी.खिल्लारे, अमोल गवळी,अमोल गावंडे,उबेद शेख, एस.यु गायकवाड,व्ही.एस फदाट, बी.एच शेलगावकर, सी.एम दांडगे, एस.टी राऊत यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# 'क्या हुवा तेरा वादा' जन आंदोलन संदर्भात अंबादास दानवे यांची गाव भेट

### जनसामान्यांचे प्रश्न घेतले जाणून; बैठकीला उदंड प्रतिसाद

**परतूर । प्रतिनिधी-** तालुक्यातील मौजे वलखेड येथे ' क्या हुवा तेरा वादा जन आंदोलन' निमित्ताने गाव बैठक संपन्न झाली. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शेतकऱ्यांची कर्जमाफी ,१ रुपयात पीकविमा योजना बंद करण्यात आली, लाडक्या बहिणीला वाढीव रक्कम सोडाच परंतु १५०० रुपये वेळेवर मिळत नाहीत यासह परतूर पंचायत समितीत घरकुल योजनेचा लाभ पैसे दिल्या शिवाय मिळत नाही अशा अनेक सरकारच्या समस्यांचा पाढा वलखेड येथील ग्रामस्थांनी दानवे यांच्यासमोर मांडल्या. त्या बाबत गट विकास अधिकारी, कृषी अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना फोन करून समस्या तात्काळ सोडवण्यासाठी आदेश दिले. याप्रसंगी शिवसेना नेते माधवराव मामा कदम, महेश नळगे, भारत पंडित, मधुकर खरात, प्रभाकर खंदारे, विठ्ठल वटाणे, शरीफ कुरेशी, दत्ता सुरुंग, मधुकर पाईकराव, गणपत खोसे, दिलीप निकम, विजय गिरी, गजानन वटाणे, दिपक काळे, श्रीहरी सुरुंग, बळीराम सोळंके, लखन डव्हारे, ऋषी बिल्लारे सह शिवसेना उबाठा गटाचे कार्यकर्ते तसेच वलखेड व परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते.
विधानसभा निवडणुकीमध्ये महायुती सरकारने आश्वासनांचा पाऊस पाडला होता या आश्वासनांची पूर्तता अद्याप पर्यंत झालेली नाही. त्यामुळे या सरकारला त्यांनी दिलेल्या आश्वासनांची



आठवण करून देण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने क्या हुआ तेरा वादा हे अभियान सुरू करण्यात आले आहे. याच अभियानाचा भाग म्हणून आज परतूर तालुक्यातील वलखेड येथे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या समस्याच जाणून घेतल्या. यावेळी गावातील बहुतांश ग्रामस्थ उपस्थित होते. सरकारने दिलेल्या आश्वासनांपैकी किती आश्वासने पूर्ण झाली आणि किती बाकी आहेत? याचा आढावा दानवे यांनी घेतला व याबाबत सरकारला धारेवर धरून समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असा विश्वास दिला.

## नेपाळ येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत ईश्वरी जाधव तृतीय, तर जुडो कराटे मध्ये प्रथम

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील अकोलादेव तांडा येथील रहिवासी ईश्वरी संतोष जाधव ही नेपाळ काठमांडू येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करतांना तृतीय क्रमांक मिळविला तर जुडो कराटे मध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे. तीचा दिल्ली येथे क्रिडा चषक पदक देऊन सत्कार करण्यात आला होता. जालना येथे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी सत्कार केला. माजी केंद्रीय रेल्वे राज्य मंत्री रावसाहेब पाटील दानवे व आमदार संतोष पाटील दानवे यांनी फोनवरून तीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. अकोलादेव येथील माजी सरपंच संजय राठोड, प्रहलाद महाराज राठोड, जब्बर महाराज जाधव, सरपंच बबनराव राठोड पं.स.सदस्य दादाराव सवडे, बी.डी.सवडे. रामेश्वर सवडे, पंजाबराव सवडे, गणेश सवडे, गणेश राठोड, प्रकाश राठोड, छबु राठोड यांनी अभिनंदन केले आहे.

## जालना येथील कार्यक्रमात टेंभुर्णी जनरल असो.चा विशेष सत्कार

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** जालना येथील जैन भवन मध्ये आयोजीत जनरल मर्चंटच्या अधिवेश मध्ये टेंभुर्णी येथील जनरल असोशियनचा विशेष सत्कार करून येथील ज्येष्ठ व्यापारी ज्ञानेश्वर डोमळे यांचा विशेष सत्कार करून त्यांना प्रशस्ती पत्र देण्यात आले. जालना येथील कार्यक्रमाला माजी खासदार व माजी मंत्री रावसाहेब दानवे यांची सुद्धा उपस्थिती आणि मार्गदर्शन लाभले होते. जनरल चे जिल्हा अध्यक्ष श्री हस्तिमल बंब भास्कर दानवे, यांच्या सह सतीश पंच, संदीप काबरा, सीताताई मोहिते, घनश्याम अग्रवाल, अंकुशराव राऊत, यांच्या सह अनेक मान्यवर या वेळी मंचावर उपस्थिती होते. गेल्या वीस वर्षां पासून टेंभुर्णी येथील जनरल असोशियन ही चांगली कार्यरत असून आपल्या व्यवसाय मार्फत टेंभुर्णीकरांची चांगली सेवा करत आहे. व येथील सर्व व्यापारी तरुण होतकरू असून यांच्या जिल्हा लेवल वर नेहमी सहकार्य असते अशी भावना पुरस्कार देता वेद श्री बंब यांनी केली. या वेळी व्यापारी महासंघाचे जिल्हा सदस्य व स्थानिक अध्यक्ष अलकेश सोमाणी जनरल चे स्थानिक अध्यक्ष रामप्रसाद बारगुडे सचिन गायमुखे, नंदकिशोर बोराडे, दिनेश जोशी, नारायण धनवई यांची पुरस्कार घेता वेळी उपस्थिती होती. या कार्यक्रमाला जालना जिल्यातील सर्व जनरल असोशियन चे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

## आश्वासनाची खैरात वाटणाऱ्या महायुतीने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली

### विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे



**मंठा । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीदरम्यान आश्वासनाची खैरात वाटणाऱ्या महायुती सरकारने शेतकऱ्यांनसह सामान्य जनतेच्या तोंडाला पाने पुसन्याचे पाप केले आहे त्यांना राज्यातील जनता कधीही माफ करणार नाही अशी टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी वैद्य वडगाव ता.मंठा (ता.७) शनिवार रोजी क्या हुआ तेरा वादा अभियाना अंतर्गत सुरू असलेल्या बैठकी दरम्यान बोलताना केली.या प्रसंगी उप जिल्हा प्रमुख महादेव कदम महेश नळगे प्रदीप बोराडे अशोक अघाव माऊली सरकटे अनंता वैद्य आसाराम बोराडे व्यासपीठावर उपस्थित होते उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री दानवे म्हणाले की,शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांचा महायुती सरकारला विसर पडला असल्याने त्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उबाठाच्यावतीने क्या हुआ तेरा वादा, असा प्रश्न सरकारला विचारण्यात येत आहे.महायुतीचे सरकार सत्तेत आल्यानंतर अनेक योजना जाहीर केल्या, भरभरुन आश्वासने दिली.यात प्रामुख्याने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी,लाडक्या बहीण चे १५०० रु.२१०० रु करण्याचे दिलेले आश्वासन तसेच जीएसटीचा परतावा, नियमित कर्ज फेड करणाऱ्या खातेदारांन प्रोत्साहनपर अनुदान,वृद्ध नागरिकांना पेन्शन २५ लाख नोकऱ्या आणि १० हजार विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याची घोषणा शासनाने केली होती त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास महायुती सरकारच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा श्री दानवे यांनी या वेळी बोलताना दिला.कार्यक्रम यशस्वीतेसाठीबाळासाहेब वैद्य सचिन चव्हाळ रवी काळे दासु खरात पांडुरंग वैद्य इम्रान पठाण निलेश बोराडे सतीष खवने गोरख चव्हाण ऋतिक जाधव गजानन झोल प्रवीण पंडित तानाजी मोरे डिगांबर बोराडे ओम केधंळे पवन वाघमारे राम वैद्य यांनी परिश्रम घेतले.अनंतराव वैद्य, मा.सरपंच, समाधान वैद्य, कैलासराव वैद्य सरपंच, गणेशराव वैद्य,गणेशराव नळगे,प्रविण वैद्य, निलेश वैद्य, माऊली वैद्य,जिवन वैद्य, सुनील वैद्य,किसन वैद्य, नवनाथ वैद्य, अविनाश मगर, बाळासाहेब देशमाने, यांनी परिश्रम घेतले



**जालना - सदर बाजार ईदगाह येथे ईद उल अज्हाची नमाज अदा करण्यात आली. यावेळी गळाभेट करून एकमेकांना शुभेच्छा दिल्या (छाया- जावेद तंबोली)**

# जाफराबाद आगारातून १३ नव्या एस.टी. बस सेवा सुरु

## आमदार संतोष दानवे यांच्या हस्ते लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी -** जाफराबाद आगारातून एकूण १३ नव्या एस.टी. बससेवा आजपासून सुरु करण्यात आल्या असून त्यांचा लोकार्पण सोहळा पंचायती राज समितीचे अध्यक्ष व आमदार संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते संपन्न झाला.

या लोकार्पणात मानव विकास मिशन अंतर्गत ८ नवीन बस तसेच सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांच्या प्रवासासाठी ५ लालपरी बस यांचा समावेश आहे. यावेळी जाफराबादचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, एस.टी. आगारप्रमुख, तसेच भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विशेषतः लोकप्रतिनिधी म्हणून फक्त रिबीन कापून थांबण्याऐवजीया आमदार दानवे यांनी औपचारिकतेपलीकडे जाऊन प्रत्यक्ष बसमध्ये प्रवास करून सामान्य प्रवाशांचा अनुभव घेतला. त्यांनी जाफराबाद ते टेंभुर्णी दरम्यान लालपरी बसने प्रवास केला. प्रवासादरम्यान त्यांनी कंडक्टरकडून तिकीटही काढले व कार्यकर्त्यांसह बसमधील प्रवाशांशी संवाद साधला. या प्रसंगाने उपस्थितांमध्ये समाधान आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. जनतेच्या सोयीसाठी नव्या बससेवा सुरू करण्याबरोबरच, एका लोकप्रतिनिधीने प्रत्यक्ष प्रवास करून आपलेपणाचा दाखला दिला, हे विशेषत्वाने जाणवले.

नेतेपणाच्या आभाळात झेपावलेला नेता, पण पाय जमिनीवर! हे दृश्य पाहून बसमधील प्रवाशांच्या चेहऱ्यावर कौतुक, प्रेम आणि आपलेपणाची लहर उसळली. तीन वेळा आमदार, आणि प्रथितयश नेते रावसाहेब पाटील दानवे साहेबांचे सुपुत्र असूनही सर्वसामान्यांमध्ये मिसळून हा प्रवास करणं म्हणजे राजकारणात माणुसकीचा स्पर्श काय असतो याचं जगजाहीर उदाहरण ठरलं.









हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.